
GPS Map Camera
Google
Uran Islampur, Maharashtra, India
3759+5JM, Maharshi Shinde Nagar, Uran Islampur,
Maharashtra 415409, India
Lat 17.057846° Long 74.268992°
03/01/25 10:24 AM GMT +05:30


Google
Pune Division, Maharashtra, India
K b p college road, Maharshi Shinde Na
25°C
Lat: 17.05 Long: 74.26
2025/01/03 10:42 AM


GPS Map Camera
Check In
Google
Uran Islampur, Maharashtra, India
K B P College Road, Maharshi Shinde Nagar,
Uran Islampur, Maharashtra 415409, India
Lat 17.057258° Long 74.268827°
03/01/25 11:42 AM GMT +05:30

# In Short



इस्लामपूर : व्याख्यानात बोलताना डॉ. उर्मिला क्षीरसागर, सभामंचावर संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील, कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे व अन्य.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्या संघर्षात क्रांतीदायी प्रेरणा : डॉ. क्षीरसागर

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक संघर्षात भारतीय स्त्रीमुक्तीच्या क्रांतीदायी प्रेरणा असुन त्यांच्या योगदानाचे परिशीलन करुन आजच्या स्त्रियांनी आपल्या मानवी हक्कासाठी लढा द्यावा, असे प्रतिपादन प्रा. डॉ. उर्मिला क्षीरसागर यांनी केले. येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये सावित्रीबाई फुले युवती मंचने आयोजित केलेल्या व्याखानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन आर पाटील होते. प्रा. मनीषा पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. समिता पाडवी यांनी परिचय करुन दिला. प्रा. अश्विनी थोरात यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. सुज्ञानी भोजकर यांनी केले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदि, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, प्रा. स्मिता पाटील तसेच विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

---

हे त्यांच्या वारसाच्या नावाने स्थलांतरित व्हावे, आम्हाला

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंचा इतिहास संघर्षमय

### प्रा. डॉ. उर्मिला क्षीरसागर : कर्मवीरमध्ये व्याख्यान



इस्लामपूर : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात बोलताना डॉ. उर्मिला क्षीरसागर.

**प्रतिनिधी**
इस्लामपूर

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या आयुष्यव्यापी व्यक्तिगत आणि सामाजिक संघर्षात भारतीय स्त्रीमुक्तीच्या क्रांतीदायी प्रेरणा असून त्यांच्या योगदानाचे परिशीलन करून आजच्या स्त्रियांनी आपल्या मानवी हक्कासाठी लढा द्यावा, असे प्रतिपादन सांगली येथील श्रीमती मथुबाई गरवारे महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. उर्मिला क्षीरसागर यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेचे, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये सावित्रीबाई फुले युवती मंचने आयोजित केलेल्या व्याखानात अतिथी वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर पाटील होते.

'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्त्रीशिक्षण संघर्ष आणि आजची स्त्री' या विषयावर बोलताना डॉ. उर्मिला क्षीरसागर म्हणाल्या, महात्मा जोतीराव फुले यांच्या जोडीने सावित्रीमाईंनी स्त्रीशिक्षण, जातीविषमता व स्त्रीदास्य रूढी मोडीत काढण्यासाठी आयुष्यभर खडतर संघर्ष केला. तत्कालीन समाजाच्या विरोधापुढे त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांनी समाजपरिवर्तन व मराठी साहित्याला दिलेल्या योगदानापासून आपण सर्वांनी प्रेरणा घेवून समाजातील दुष्टप्रवृत्तीशी लढा दिला पाहिजे.

अध्यक्षीय समारोप करताना ॲड. एन. आर. पाटील यांनी सध्या नव्याने मुक्तीची शैक्षणिक चळवळ गतिमान करण्यास विद्यार्थी, शिक्षकवर्ग व जनतेने प्रयत्न केले पाहिजे, असे मत मांडले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले युवती मंचच्या अध्यक्ष प्रा. मनिषा पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. प्रा. समिता पाडवी यानी अतिथी वक्त्यांचा परिचय करून दिला.

प्रा. अश्विनी थोरात यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. सुज्ञानी भोजकर यांनी केले. प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, संस्थेचे सदस्य प्रा. स्मिता पाटील तसेच विद्यार्थी व प्राध्यापकवृंद यांची उपस्थिती होती.